# जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्ग—ओरोस.

## नागरीकांची सनद
## Citizen Charter)

प्रस्तावना :—

जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्गची ओरोस, ता.कुडाळ येथे दिनांक २५/०१/१९९७ रोजी मा.श्री.न्यायमूर्ती अेम्.बी.शहा, तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या शुभहस्ते व मा. श्री.व्ही.जी.मुनशी, तत्कालीन जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांच्या उपस्थितीत स्थापना करणेत आली.

जिल्हा न्यायालये व जिल्ह्यातील इतर न्यायालये ही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्त्याखाली येतात. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय हे जिल्हयातील सर्वात उच्च न्यायीक प्राधिकरण आहे. या न्यायालयाखेरीज प्रमुख जिल्हा न्यायाधीशांचे नियंत्रणाखाली जिल्हा मुख्यालयात, जिल्हा न्यायाधीश—१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश—२ व सहायक सत्र न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) व मुख्य न्यायदंडाधिकारी, तसेच सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) व अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांची न्यायालये तसेच तालुका पातळीवरील कुडाळ, वेंगुर्ले, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड व दोडामार्ग येथे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग—१ यांची न्यायालये व सावंतवाडी, कणकवली, कुडाळ, वेंगुर्ले येथे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग—१ यांची न्यायालये येतात. तसेच वैभववाडी येथे न्यायाधिकारी, ग्रामन्यायलय, वैभववाडी यांचे न्यायालय आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आणि जिल्हा न्यायाधीश—१ व अति.सत्र न्यायाधीश हे दोन प्रकारच्या अधिकारीतेचा म्हणजेच मुळ अधिकारीता व अपिल अधिकारीता यांचा वापर करतात. जिल्हयामध्ये जिल्हा न्यायालय हे काही प्रकरणात मुळ दिवाणी अधिकारीतेचे मुख्य न्यायालय आहे. दुय्यम न्यायालयांनी केलेल्या हुकुमनाम्यावरील व हुकुमावरील अपिलाचे सुध्दा ते न्यायालय आहे. जिल्हा न्यायालय हे सर्व दिवाणी न्यायालये व त्यांच्या आस्थापनांवर सर्वसाधारण नियंत्रण ठेवते व त्या न्यायालयांच्या कामकाजाचे निरीक्षण करते.

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांना रक्कम रु.५,००,०००/— च्या वरील मुल्याच्या दाव्याचे संपरिक्षण करण्याचा अधिकार दिलेला आहे. तसेच दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांना रक्कम रु.५,००,०००/— पर्यंतच्या दाव्याचे संपरिक्षण करण्याचा अधिकार दिलेला आहे.

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांना रक्कम रु.५०,००,०००/— ते १ कोटी मूल्यांकनाचे व्यावसायिक दावे चालविणेचा अधिकार आहे. सदर दाव्यातील निकालाविरुध्दचे अपिल चालविणेचा अधिकार जिल्हा न्यायाधीश—१ यांना आहे. तसेच रक्कम रुपये १ कोटीपेक्षा जास्त मूल्यांकनाचे व्यावसायिक दावे चालविण्याचा अधिकार जिल्हा न्यायाधीश — २ यांना आहे. सदर दाव्यातील निकालाविरुध्दचे अपिल मा.उच्च न्यायालयात दाखल होते.

..२/—

प्रमुख जिल्हा न्यायाधीश हे जिल्हयाचे सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश–१ हे अतिरिक्त सत्र न्यायाधीश व जिल्हा न्यायाधीश–२ हे सहायक सत्र न्यायाधीश आहेत व त्यादृष्टीने ते फौजदारी प्रकरणांचे संपरिक्षण करतात. सत्र न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश हे भारतीय दंड विधानानुसार अधिकार दिलेल्या केसीस व मुख्य न्यायदंडाधिकारी व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी दिलेल्या न्यायनिर्णयावर दाखल झालेल्या अपिलांची सुनावणी करतात. लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम व अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमाखाली येणारी प्रकरणे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व जिल्हा न्यायाधीश–१ यांचे न्यायालयात चालविली जातात. लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली येणारी प्रकरणे, महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंध संरक्षण कायदा व मादक औषधे आणि मनोचिकित्सा अधिनियमांतर्गत येणारी प्रकरणे जिल्हा न्यायाधीश–१ यांचे न्यायालयात चालविली जातात.

सत्र न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश हे कायद्याने अधिकार दिलेली कोणतीही शिक्षा देवू शकतात, परंतू, अशा कोणत्याही न्यायाधीशाने दिलेली देहांताची शिक्षा, उच्च न्यायालयाकडून कायम होण्याच्या अधीन असते.

मुख्य न्यायदंडाधिकारी हे सात वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा देवू शकतात तसेच प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी हे तीन वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा देवू शकतात.

## विभागाच्या कामाचा सविस्तर तपशिल

जिल्हा न्यायालयाचे कामकाज प्रामुख्याने खाली नमुद केलेल्या पाच शाखांमध्ये विभागलेले आहे.

### प्रशासन विभाग

सिंधुदूर्ग जिल्हयातील सर्व न्यायीक अधिकारी व कर्मचारी यांचे संदर्भात सर्व प्रशासकीय बाबी म्हणजेच न्यायीक अधिका–यांच्या सर्व प्रकारच्या रजा, सेवापुस्तके, कर्मचा–यांच्या विशेष रजा, अधिका–यांच्या व कर्मचा–यांच्या वेतनवाढी, कर्मचा–यांच्या बदल्या, गोपनिय अहवाल इ. बाबी या शाखेकडून हाताळणेत येतात. या शाखेचा प्रमुख “अधीक्षक (प्रशासन)” हा असतो.

### तपासणी विभाग

या शाखेकडून जिल्हा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणा–या सर्व न्यायालयांच्या कामकाजाची तपासणी केली जाते. दिवाणी व फौजदारीकडील प्रकरणे दाखल करुन घेतली जातात. सद्यस्थितीत ना.उच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे e-filing या संगणकीय प्रणालीद्वारे दिवाणी व फौजदारीकडील प्रकरणे दाखल करुन घेतली जातात. तसेच ना.उच्च न्यायालयाकडून त्यांचेकडील प्रकरणातील येणारी रिटस् या शाखेकडून प्रमाणित केली जातात. जिल्हा न्यायालयात दाखल झालेल्या फौजदारी प्रकरणातील मुद्देमाल या शाखेद्वारे न्यायालयात जमा केला जातो आणि जिल्हा न्यायालयाच्या अधिपत्याखालील इतर न्यायालयांकडील दिवाणी व फौजदारीकडील

विवरणपत्रांमधील माहिती एकत्रित करुन ती माहिती ना.उच्च न्यायालयाकडे पाठविण्याचे कामसुध्दा या शाखेद्वारे केले जाते. या शाखेचा प्रमुख "अधीक्षक (न्याय)" हा असतो.

## न्याय शाखा

या शाखेत प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयातील दिवाणी व फौजदारीकडील सर्व प्रकरणे असतात व त्यांना प्रत्यक्ष न्यायदानाचे कामाचे वेळी लागणारी मदत व सर्व प्रकरणातील माहिती संगणकामध्ये अद्ययावत साठविण्याचे काम या शाखेकडून केले जाते. या शाखेचा प्रमुख "अधीक्षक (न्याय)" हा असून त्यांचे हाताखाली सहाय्यक अधीक्षक असतो. सहाय्यक अधीक्षक हा प्रमुख जिल्हा न्यायाधीशांना न्यायालयासमोर चालणा—या कामकाजातील प्रकरणे हाताळणेच्या कामी मदत करीत असतो.

## वित्त विभाग

या शाखेद्वारे जिल्हा न्यायालय व त्याच्या अधिपत्त्याखालील इतर न्यायालयांच्या आर्थिक बाबी पाहिल्या जातात. तसेच वेगवेगळया लेखा शिर्षाखाली अनुदान मंजूर होणेसाठी शासनाकडे अंदाजपत्रक पाठविणे, शासनाकडील खर्चमेळाचे काम पहाणे, कर्मचा—यांची सेवापुस्तके/सेवापट अद्ययावत ठेवणे, अधिका—यांची व कर्मचा—यांची वेतनदेयके व इतर प्रकारची देयके करणे वगैरे कामे या शाखेद्वारे पाहिली जातात. त्याशिवाय, न्यायालयासाठी लागणारी लेखनसामुग्री, फर्निचर, ग्रंथालयासाठी लागणारी पुस्तके वगैरे खरेदीचे व्यवहार हे या शाखेमार्फत केले जातात. या शाखेचा प्रमुख "अधीक्षक (प्रशासन)" हा असतो.

प्रतिवादी/उत्तरवादी/सामनेवाला/आरोपी यांना समन्स/नोटीस पाठविणेकरीता सध्या कोणतीही आदेशीका फी वादी/अपीलकार/फिर्यादी यांना द्यावी लागत नाही.

## अभिलेख शाखा

या शाखेमध्ये जिल्हा न्यायालयातील व त्याच्या अधिपत्त्याखालील सर्व न्यायालयांमधील निकाली प्रकरणांतील अभिलेख जतन करुन ठेवण्याचे काम केले जाते. तसेच दिवाणी व फौजदारी मॅन्युअल मधील तरतुदीनुसार कालबाहय झालेले अभिलेख नाश करण्याचे काम या शाखेद्वारे केले जाते. त्याप्रमाणे पक्षकारांनी मागणी केलेल्या सहीसूद नक्कला पुरविणे, पेपरबुके तयार करणे इ. प्रकारची कामेसुध्दा या शाखेद्वारे केली जातात. या शाखेचा प्रमुख "अधीक्षक (न्याय)" हा असतो. साध्या लिहिणावळीने मागणी केलेली नक्कल अर्जाच्या पूर्ततेपासून १० दिवसांत व तात्काळ लिहिणावळीने मागणी केलेली नक्कल अर्जाची पूर्तता झाल्यापासून शक्य तर २४ तासांत व कोणत्याही परिस्थितीत ४८ तासांत (सुट्टीचे दिवस वगळून) देणे बंधनकारक आहे. सहीसूद नक्कलेची फी पुढीलप्रमाणे आहे. साधी लिहिणावळ फी १—पृष्ठ रु.०४/— व तात्काळ लिहिणावळ फी—१ पृष्ठ रु.०७/—.

जिल्हा न्यायालयातील प्रबंधक हे प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांना प्रशासकीय कामकाजात मदत करतात व जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील सर्व कामकाजावर देखरेख करतात. प्रबंधक हा, प्रमुख जिल्हा न्यायाधीश व कर्मचारी यांच्यामधील दुवा आहे. ना.उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार न्याय खात्यास लागू केलेला आहे व त्यांचेकडील अधिसूचनेद्वारे प्रबंधक यांना “जन माहिती अधिकारी” म्हणून घोषित करणेत आलेले असून जिल्हा न्यायाधीश–१ यांना “अपिलीय अधिकारी” म्हणून घोषित केलेले आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती यासोबत जोडलेल्या विवरणपत्र १ मध्ये दिलेली आहे.

तसेच ना.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा न्यायालयात “संगणक कक्ष” तसेच पक्षकारांच्या व वकीलांच्या सोयीसाठी “ई–सुविधा केंद्र” सुरु करणेत आलेले आहे. जिल्हा न्यायालयातील व इतर न्यायालयातील संगणकाचे कामकाजात येणा–या समस्यांचे निरसन करणे व ना.उच्च न्यायालयाकडून संगणकाबाबत वेळोवेळी मागविलेली माहिती पाठविणे हे त्यांचे काम आहे. संगणक कक्षाचा जिल्हा प्रणाली प्रशासक (District System Administrator) हा प्रमुख आहे.

पक्षकार व वकिलवर्ग यांना प्रकरणासंदर्भात आवश्यक माहिती मिळणेसाठी जिल्हा न्यायालयाचे प्रवेशद्वारावर KIOSK मशिन बसविणेत आलेले आहे. तसेच पक्षकारांना प्रकरणाची पुढील नेमली तारीख CIS प्रणालीमार्फत SMS द्वारे प्राप्त होते.

## जिल्हा न्यायालयाच्या अधिपत्त्याखाली येणा–या न्यायालयांच्या कामाचा तपशिल

जिल्हा न्यायालयाच्या नियंत्रणाखाली येणा–या मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, दिवाणी न्यायालय (व.स्तर) व तालुका स्तरावरील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग–१ यांची न्यायालये, यांचेकडील कामकाज प्रशासन व वित्त या दोन विभागात विभागलेले आहे.

प्रशासन विभागातून दिवाणी व फौजदारीकडील प्रकरणे दाखल करुन घेणे व तत्संबंधीची इतर कामे, कर्मचा–यांच्या रजा, त्यांची सेवापुस्तके/सेवापट अद्ययावत करणे, इ. प्रकारची कामे केली जातात.

वित्त विभागातून कर्मचा–यांची वेतन व इतर प्रकारची देयके, मुद्देमाल स्विकारणे व आदेशाप्रमाणे परत देणे व न्यायालयाच्या इतर आर्थिक बाबी सांभाळणे इ.प्रकारची कामे केली जातात.

लोक अदालतीमध्ये तडजोडीने प्रकरण निकाली झाल्यास वादी/फिर्यादीस पूर्ण न्यायालयीन फीचा परतावा मिळतो.

# संकीर्ण

मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पर्यायी वाद निवारण केंद्र म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग हे कार्यालय देखील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या अधिनस्त कार्यरत आहे. गरजूंना विधी विषयक सहाय्य मिळवून देणेकामी आवश्यक ती सर्व मदत करणे हे काम देखील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या कार्यालयामार्फत पार पाडले जाते. जनसामान्यांमध्ये कायदे व कायद्यांतील तरतूदी, शासनाच्या विविध योजना व अन्य बाबींची माहिती देण्यासाठी वेळोवेळी कायदेविषयक सहाय्य, सल्ला, शिबीरांचे आयोजन करणे, लोकन्यायालय आयोजीत करणे इत्यादी कामेदेखील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत पार पाडली जातात. वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायाधीश संवर्गातील एक न्यायिक अधिकारी सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण म्हणून नियुक्त असून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग हे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष म्हणून नियुक्त आहेत.

दिनांक :— २९/०२/२०२४.

( एस्. एस्. जोशी )
प्र.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.

# विवरणपत्र — १.

## नागरीकांची सनद (Citizen Charter)

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणा—या सेवा (स्तर नमुद करावा.) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे. | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिका—याचे नांव नमुद करावे.) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारीत असल्यास विहीत/ सर्वसाधारण) | अपिल असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपिल करण्याचा विहीत कालावधी. | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता). |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्ग—ओरोस. | जनतेकडून माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना उत्तरे. | ना.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक पी. ०७०३/ २००९ दिनांक ०३/०९/०९ अन्वये विहीत केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जावर रु.१०/— चा कोर्ट फी स्टॅम्प जोडावा. | प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्ग—ओरोस. | अर्जाची पुर्तता झालेपासून ३० दिवस. | <u>अपिलीय प्राधिकारी</u> :— जिल्हा न्यायाधीश—१ व अति.सत्र न्यायाधीश, सिंधुदूर्ग—ओरोस <u>**अपिल करण्याचा विहीत कालावधी :—**</u> अर्ज निकाली केलेची सूचना पोहोचल्यापासून ३० दिवसांचे आंत. | जिल्हा न्यायाधीश—१ व अति.सत्र न्यायाधीश, सिंधुदूर्ग—ओरोस |
| २ | ———"——— | जनतेकडून माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अपिलांना उत्तरे. | ना.उच्च न्यायालय,मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक पी. ०७००२/२००६ दिनांक ०३/११/२००६ अन्वये निर्देश दिलेप्रमाणे, जन माहिती अधिका—याने दिलेल्या निकालाच्या सत्यप्रतीसह, रु.२०/— च्या कोर्ट फी स्टॅपसह अर्ज करावा. | जिल्हा न्यायाधीश—१ व अति.सत्र न्यायाधीश, सिंधुदूर्ग—ओरोस. | अपिलाची पुर्तता झालेपासून ३० दिवस व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवस | <u>अपिलीय प्राधिकारी</u> :— राज्य जन माहिती आयुक्त, कोकण विभाग कोकण भवन, सी.बी. डी.बेलापूर, नवी मुंबई. <u>**अपिल करण्याचा विहीत कालावधी :—**</u> अपिल निकाली केलेची सूचना पोहोचल्यापासून ९० दिवसांचे आंत. | —— |

दिनांक:— २९/०२/२०२४.

(स्वाक्षरी)
प्र.प्रमुख ~~जिल्हा व सत्र~~ न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.